जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :-२३ फेब्रुवारी, २०२३

**बातमी क्रमांक १**

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) इयत्ता ९ वी ते १२ मध्ये शिकणा-या गुणवंत विद्यार्थिनींसाठी भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागामार्फत विज्ञानज्योती उपक्रम राबविला जात असून जळगाव जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनींना या उपक्रमात मार्गदर्शन आणि ज्ञानभागीदार म्हणून काम करण्याची जबाबदारी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडे सोपविण्यात आली आहे.

सन २०१९-२०२० मध्ये भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने विज्ञानज्योती कार्यक्रम सुरू केला आहे. इयत्ता ९ वी ते १२ या वर्गात शिकणा-या गुणवंत विद्यार्थिनींना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या विषयाची आवड निर्माण व्हावी हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमाचे आता हे तिसरे वर्ष सुरू असून जवाहर नवोदय विद्यालयामार्फत देशातील २०० निवडक जिल्ह्यांमध्ये प्रत्येक जिल्हा केंद्रावर १०० गुणवंत विद्यार्थिनींना या उपक्रमात सामावून घेतले जाणार आहे. या निवडलेल्या विद्यार्थिनींना वर्षभर विविध उपक्रमात सहभागी करून घेतले जाणार आहे. विज्ञानातील रोल मॉडेल्स समवेत संवाद, विज्ञान शिबिरात सहभाग, करीअर समुदेशन, विशेष वर्ग, कार्यशाळा आदी उपक्रमांचा यात समावेश असेल. या विद्यार्थिनींना उच्च शिक्षणातील राष्ट्रीय स्तरावरील महत्वाच्या संस्था जसे की, संशोधन विकास प्रयोगशाळा, आयआयटी, एनआयटी, आयआयएसईआर या संस्थासोबत जोडून घेण्याचा प्रयत्न राहणार आहे.

या विज्ञानज्योती कार्यक्रमाचा एक भाग आता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ होणार आहे. जळगाव जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालयातील निवडक गुणवंत विद्यार्थीनीना या उपक्रमांतर्गत मार्गदर्शकाची जबाबदारी विद्यापीठावर देण्यात आली आहे. हे विद्यापीठ आता ज्ञानभागीदार म्हणून या उपक्रमात काम करेल. या उपक्रमासाठी लवकरच विद्यापीठाकडून नोडल अधिकारी म्हणून एका प्राध्यापकाची नियुक्ती केली जाणार आहे. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या विज्ञान व अभियांत्रिकी महिला विभागाच्या प्रमुख व सल्लागार डॉ. निशा मैंदिरत्ता यांनी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांना नुकतीच पत्राव्दारे ही माहिती कळविली आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव, दि.२३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठी विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय बोलीभाषा दिनानिमित्त परिसंवाद घेण्यात आला व भित्तिपत्रिकेचे विमोचन करण्यात आले.

बोली भाषेतील गमती जमती या विषयावर झालेल्या या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. म. सु. पगारे होते. प्रमुख अतिथी म्हणून धुळे येथील डॉ. सदाशिव सुर्यवंशी व भडगाव येथील प्रा. रमेश धनगर उपस्थित होते. डॉ. सुर्यवंशी म्हणाले की, अहिराणी ही मातीची भाषा असल्यामुळे ती अभिजात भाषा होवू शकते. बोलीभाषा टिकली तरच संस्कृती टिकेल. प्रा. धनगर यांनी अनेक दाखले देत बोलीभाषा किती प्राचीन आहे हे सांगितले. डॉ. पगारे यांनी प्रत्येक बोलीला स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व आणि अस्मिता असते असे मत व्यक्त केले.

यावेळी आदिवासी लोकनृत्य तसेच भित्तिपत्रिकेचे विमोचन करण्यात आले. सुशीला पावरा, आकाश कोंगळे, अनुष्का पावरा, विनोद पावरा, विशाल वळवी, जिगीषा मावची या विद्यार्थ्यांनी पारंपारिक पोषाख परिधान करून आदिवासी नृत्य सादर केले. भित्तिपत्रिकेत गायत्री सांळुखे, मयुरी लोंढे, सुशीला पावरा या विद्यार्थ्यांनींनी लेखन केले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गायत्री सांळुखे व कविता बोरसे यांनी केले. उज्वला लांडगे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. दिपक खरात, कृष्णा संदानशिव, डॉ. सुदर्शन भवरे, बाळासाहेब सुर्यवंशी, योगेश शिंदे, महेश सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव, दि.२३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने दिनांक २ व ३ मार्च रोजी **"लिंगभाव संवेदनशीलता"** या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

लिंगभाव संवेदनशीलता (लिंगभाव, मर्दानगी आणि सत्ता व आंतरसंबंध) असा कार्याशाळेचा विषय असून या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. विद्यापीठ परिक्षेत्रातील ६० विद्यार्थी या कार्यशाळेला हजर राहतील. विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात २ मार्च रोजी सकाळी १० वाजता कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होणार असून प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे अध्यक्षस्थानी राहतील. ३ मार्च रोजी सांयकाळी ४ वाजता कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली समारोप होणार आहे. विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए. रवींद्र पाटील हे यावेळी उपस्थित राहतील अशी माहिती संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी दिली.

**बातमी क्रमांक ४**

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) समाजाच्या शाश्वत विकासासाठी प्रत्येक क्षेत्रातील संशोधन महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन कला व मानव्यविद्या प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. अनिल चिकाटे यांनी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग आणि कॅपेसिटी बिल्डींग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित **"संशोधन प्रकल्प आणि संशोधन लेख"** या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. सुधीर भटकर, शिक्षणशास्त्र प्रशाळेचे प्रमुख प्रा. डॉ. मनिषा इंदाणी, डॉ. सुभान जाधव, डॉ. तुषार रायसिंग, डॉ. विणा महाजन, डॉ. अनिलसिंग तौर उपस्थित होते.

डॉ. चिकाटे म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण आणि बदलत्या तंत्रज्ञानानुसार संशोधन महत्वपूर्ण आहे. डॉ. सुधीर भटकर यांनी संशोधनाचे बदलते स्वरूप या विषयावर मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रथम सत्रात प्रा. डॉ. मनिषा इंदाणी यांनी संशोधन प्रस्ताव या विषयावर मार्गदर्शन केले. व्दितीय सत्रात डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी संशाधनातील समस्या तर डॉ. संतोष खिराडे यांनी संशोधनात संसाधनाचा वापर या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. सुभान जाधव यांनी केले. सुत्रसंचालन आकाशसिंग राजपूत तर आभार डॉ. तुषार रायसिंग यांनी मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी